दुरध्वनी क्रमांक :0231/2651959
Email ID:dycfkop2007r@gmail.com

महाराष्ट्र शासन
उप वनसंरक्षक (प्रा) कोल्हापुर , कोल्हापूर यांचे कार्यालय
ताराबाई पार्क, कोल्हापूर. 416023

जाक्र. : अ/वप्रार /2024-25/ 333

कोल्हापूर दिनांक 18.06.2025

**महिला मानद वन्यजीव रक्षकांची नियुक्ती करणेबाबत.**

**जाहिरात**

उपवनसंरक्षक (प्रा) कोल्हापूर, यांचे अधिनस्त क्षेत्र तथा कोल्हापूर जिल्ह्याकरिता वन्यजीव संरक्षणार्थ वन्यजीव (संरक्षण) अधिनस्त - 1972 मधील कलम -4 मध्ये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार शासनामार्फत **महिला मानद वन्यजीव रक्षकांची नियुक्ती** करावयाची आहे. नियुक्तीसाठी पात्र उमेदवाराकडून केवळ कोल्हापूर वनविभागाच्या Email ID – dycfkop2007@gmail.com वर **ZIP File** द्वारे अर्ज मागविण्यात येत आहे.

**अर्जासह खालीलप्रमाणे कागदपत्र जोडावी:**

1. ओळखपत्र
2. वन्यजीव संरक्षण, संवर्धन, मानव-वन्यजीव संघर्ष तसेच निसर्गात संकटग्रस्त, नामशेष होत चाललेल्या प्रजातीचे संवर्धन, संरक्षण इ. बाबत केलेल्या कामाचा तपशील.
3. कायमचा पत्ता याबाबतचा पुरवा.

वरील जाहिरातीचे अनुषंगाने याद्वारा सुचीत करण्यात येते की, वनसंरक्षण व वनसंवर्धनाचे काम करणाऱ्या तसेच मानववन्यजीव संघर्ष कमी करण्याचे काम करणाऱ्या उमेदवारांची / सेवाभावी संस्थांची वाढती संख्या विचारात घेऊन प्रत्येकाला वन्यजीव संरक्षणार्थ महिला मानद वन्यजीव रक्षक म्हणून काम करण्याची संधी उपलब्ध व्हावी यासाठी महिला मानद वन्यजीव रक्षक या पदाकरिता वन्यजीव संरक्षणार्थ केलेल्या कामासंबंधात स्वतंत्र प्रस्तावासह अर्ज मागविण्यात येत आहे

| अ.क्र. | कार्यवाहीचा टप्पा | दिनांक व कालावधी |
|---|---|---|
| 1 | कोल्हापूर वनविभागांचे कार्यालयाचे Email ID – dycfkop2007@gmail.com आयडीवर अर्ज स्विकारणे कालावधी | दि. 27 जुन 2025 रोजी सायंकाळी 5.00 वा पर्यंत |
| 2 | मुख्य वनसंरक्षक (प्रा) किंवा उपवनसंरक्षक यांचेमार्फत प्राप्त अर्जाची छाननी करणे. | दि 28 जुन 2025 ते 4 जुलै 2025. |

टिप- 1. आवश्यकतेनुसार वरील वेळापत्रकात बदल झाल्यास त्याबाबत वेळोवेळी https://mahaforest.gov.in या संकेत स्थळावर सूचना प्रसिध्द करण्यात येईल. अशा सुचनांचे वेळोवेळी अवलोकन करण्याची उमेदवारांनी दक्षता घ्यावयाची आहे.

2.उमेदवाराने प्रस्ताव सादर करताना ओळखपत्र व कायमचा पत्ता याबाबत पुरावा जोडणे बंधनकारक आहे.

प्रस्तुत जाहिरात ही संक्षिप्त जाहिरात असून अर्ज स्विकारण्याची पध्दत, अर्हता, निवडीचा प्रक्रिया याबाबतचा सविस्तर तपशील https://mahaforest.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. त्याचे कृपया अवलोकन करावे, उमेदवारांना कोणताही पत्र व्यवहार करण्यात येणार नसून वरील संकेतस्थळावर आवश्यक माहिती वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

(जी. गुरूप्रसाद)
उपवनसंरक्षक,
कोल्हापूर वनविभाग कोल्हापूर